# तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्रमांक १९६७, मुंबई ४०० ००१.
दुरध्वनी - २२६२०६०१, २२६९०६०२, २२६४११५०/५१, फॅक्स - २२६९२१०२.
E-mail : Desk2@dte.org.in Internet : http://www.dte.org.in


परिपत्रक

क्रमांकः २/एनजीसी/परिपत्रक/२०१८/११६७८
दिनांक : 31 AUG 2018

विषय : राज्यातील व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांचे समूपदेशन करण्याबाबत .

महाराष्ट्र राज्यातील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय, अनुदानित, विनाअनुदानित व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या संस्थांना सुचित करण्यात येते की, व्यावसायिक अभ्यासक्रमांच्या विद्यार्थ्यांमध्ये सद्यस्थितीत तीव्र स्पर्धात्मक युगामूळे ताण-तणाव व नैराश्याची भावना निर्माण होत असल्याची बाब संचालनायाच्या निदर्शनास येत असल्याने, सर्व संस्थांनी त्यांच्या संस्थेतील सर्व विद्यार्थ्यांचे वेळोवेळी समुपदेश करण्यात यावे. यासाठी मार्गदर्शन व समुपदेशन सेलची स्थापना करण्यात यावी. विद्यार्थ्यांना येणा-या अडी-अडचणी लक्षात घेऊन त्यांच्या ताण- तणावाचे संस्थास्तरावर वेळीच निवारण करण्यात यावे. सांघिक चर्चासत्रे, मार्गदर्शनपर आणि स्फुर्तीदायक व्याख्याने, विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता वाढीस लागण्याकरीता शिबीरे यांचे आयोजन करण्यात यावे. जेणेकरून सर्व विद्यार्थ्यांचे मानसिक स्वास्थ्य निरोगी राहून त्यांच्यामध्ये नैराश्याची भावना निर्माण होवू नये म्हणून संस्थास्तरावर सर्व ते प्रयत्न करण्यात यावेत. याबाबत केलेल्या कार्यवाहीचा नियतकालिक अहवाल आपल्या संबंधित तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयामार्फत संचालनालयास सादर करण्यात यावा.

सहसंचालक तंत्रशिक्षण
प्रादेशिक कार्यालय, नागपूर
आवक 7364
दिनांक 31 AUG 2018

(डॉ. अभय वाघ)
संचालक
तंत्रशिक्षण महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रत :

---

पृ.क्र.तंशिस/प्राकाना/शैवि/2018/ 2932
सहसंचालक, तंत्रशिक्षण, विभागीय कार्यालय, नागपूर
दिनांकः- 3 SEP 2018

प्रति,

प्राचार्य,
सर्व पदवी, पदव्युत्तर पदवी व पदवीका संस्था,
नागपूर विभाग, नागपूर

यांना कळविण्यात येते की, उपरोक्त पत्रात नमुद केल्यानुसार आपल्या संस्थेतील विद्यार्थ्यांचे मनोबल वाढवण्याकरीता सांघिक चर्चासत्रे, मार्गदर्शनपर आणि स्फुर्तीदायक व्याख्याने, विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता वाढीस लागण्याकरीता शिबीरे आयोजीत करावी व केलेल्या कार्यवाहीचा नियतकालिन अहवाल या कार्यालयाकडे दर महिन्याच्या 30 तारखेपर्यंत सादर करावा.

(गुलाबराव ठाकरे)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, नागपूर